सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
शासकीय तंत्रनिकेतन विक्रमगड
मु.पो-शिळ, पो-ओंदे,झडपोली शिळ रोड, तालुका-विक्रमगड,जिल्हा पालघर -४०१६०५
E mail- gpvikramgad11@gmail.com, office.gpvikramgad@dtemaharashtra.gov.in

**दिनांक: 03.07.2026**

# विद्यार्थ्यांसाठी सूचना

**जागतिक पर्यावरण दिन २०२६ निमित्त पोस्टर स्पर्धा**

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त महाविद्यालयात **पोस्टर स्पर्धेचे आयोजन** करण्यात आले आहे. पर्यावरण संवर्धन, वृक्षारोपण, प्लास्टिकमुक्त भारत, जलसंवर्धन, जैवविविधता, हवामान बदल, शाश्वत विकास इत्यादी विषयांवर विद्यार्थी आकर्षक व प्रभावी पोस्टर तयार करून सहभागी होऊ शकतात.

**स्पर्धेचे नियम :**

1. स्पर्धा **फक्त वैयक्तिक (Individual)** स्वरूपाची असेल.
2. पोस्टर खालील दोन स्वतंत्र गटांमध्ये स्वीकारले जातील :
    - **हस्तनिर्मित (Handmade) पोस्टर**
    - **Digital/ AI च्या सहाय्याने तयार केलेले (Digital/AI Generated/Designed) पोस्टर**
3. दोन्ही गटांसाठी स्वतंत्रपणे **प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाचे पारितोषिक** देण्यात येईल.
4. पोस्टर/बॅनर **सुस्थितीत, स्पष्ट व उच्च प्रतीच्या प्रिंटमध्ये** सादर करणे आवश्यक आहे.
5. पोस्टरचा विषय पर्यावरण जनजागृतीशी संबंधित असावा व संदेश प्रभावी, सकारात्मक आणि समाजोपयोगी असावा.
6. पोस्टरवर विद्यार्थ्याचे **नाव, शाखा, वर्ष व संपर्क क्रमांक** मागील बाजूस नमूद करावा.
7. **दिनांक ६ जुलै २०२६ (सोमवार)** रोजी सकाळी महाविद्यालयात पोस्टर प्रत्यक्ष सादर करावे.
8. उत्कृष्ट निवडलेले पोस्टर्स महाविद्यालय परिसरात प्रदर्शित करण्यात येतील तसेच **पर्यावरण जनजागृती रॅलीमध्ये** वापरण्यात येतील.
9. विद्यार्थ्यांनी आपले पोस्टर चा फोटो खालील फॉर्म मध्ये अपलोड करावा :
   https://forms.gle/NsTvqYHkn2vyWTpB9
   आपले पोस्टर दिनांक ०६.०७.२०२६ रोजी संगणक विभाग येथे श्री जयेश मगदूम यांच्याकडे सकाळी ११.०० वाजेपर्यंत जमा करावे .

सर्व विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवून पर्यावरण संवर्धनाचा संदेश प्रभावीपणे समाजापर्यंत पोहोचवावा.

**दिनांक :** ०३/०७/२०२६

**स्थळ :** शासकीय तंत्रनिकेतन, विक्रमगड

प्राचार्य ,
शासकीय तंत्रनिकेतन विक्रमगड